**वसई–विरार शहर महानगरपालिका**
**क्रीडा विभाग, मुख्यालय**

दि.०४/०७/२०२४

**प्रेसनोट**

**प्रथम महिला महापौर प्रविणा ठाकूर यांची फुटबॉल ला कीक**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,पुणे , जिल्हा क्रीडा परिषद पालघर द्वारा व वसई विरार शहर महानगरपालिका आयोजित जिल्हास्तर सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप चा आज (ता.04जुलै) रोजी शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेच्या शुभारंभाच्या वेळी माजी महापौर प्रविणा ठाकूर यांनी फुटबॉल ला किक मारुन आनंद घेतला. या स्पर्धेमध्ये महापालिका क्षेत्रातील ८२ फुटबॉल संघांचा विविध ३ वयोगटात समावेश असून मंगळवार दि. ९ जुलै पर्यंत या स्पर्धा सुरु राहणार आहेत.

वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या स्थापने पासून महापालिका क्रीडा विभागामार्फत दरवर्षी सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचे आयोजन महापालिका करित आहे. यंदा या स्पर्धा आयोजनाचे १३ वे वर्षे आहे. यंदाच्या या स्पर्धेचा शुभारंभ माजी महिला महापौर प्रविणा ठाकूर व महापालिका अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांचे प्रमुख उपस्थित जुने विवा महाविद्यालय शेजारील मैदान येथे करण्यात आला. तसेच यावेळी माजी सभापती सखाराम महाडिक, माजी नगरसेविका रिटा सरवैया, क्रीडा उपआयुक्त सदानंद पुरव, उपआयुक्त अजित मुठे, उपआयुक्त विशाखा मोटघरे, उपायुक्त अर्चना दिवे, कार्यकारी अभियंता प्रकाश साटम, प्रदिप पाचांगे, मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव, वैद्यकीय अधिकारी भक्ती चौधरी, क्रीडा स्पर्धा प्रमुख योगश चौधरी, उपप्रमुख जितेंद्र राऊत, पालघर जिल्हा योगासन संस्थेच्या सचिव रुचिता ठाकूर, वसई तालुका फुटबॉल असोशिएशन चे समन्वयक तन्मय नेरकर ,उत्कर्ष विद्यालयच्या प्राचार्य मुग्धा लेले, क्रीडा अधिक्षक रुपाली संखे आदि उपस्थित होते.

फुटबॉल सर्धेच्या शुभारंभा वेळी सन २०२३ या वर्षी जिल्हा क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून नॅशनल स्कूल गेम्स मध्ये प्रतिनिधीत्व करुन विजेता झालेल्या तसेच सहभागी झालेल्या अशा १३ खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यांत आला. हि स्पर्धा आपल्या सर्वांसाठी महत्वाची आहे. आज या स्पर्धेमध्ये ८२ संघ सहभागी झाले आहेत याचा आम्हास आनंद आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जिवनामध्ये अभ्यासा सोबत कुठल्यातरी क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतला पाहिजे. महापालिका नेहमी

विविध स्पर्धांचे,प्रशिक्षणाचे आयोजन वर्षभर करित असते. जेणेकरुन चांगले खेळाडू या भागातून निर्माण व्हावे. खेळामुळे तुमचा वैयक्तीक विकास होतो. यास्पर्धांच्या माध्यमातून तुम्ही खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता. तुमच्या यशामुळे तुमच्या सोबत या शहराचे ,महापालिकेचे देखील नाव मोठे होते. खेळाडूंच्या कला गुणांना वाव मिळावा याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये, तसेच साहसी खेळामध्ये यश संपादन केलेल्या खेळाडूंना क्रीडा प्रोत्सहान पर बक्षिसे देते, आत्ता पर्यंत ६७०  हून अधिक खेळाडूंना महापालिकेने सुमारे २ कोटी हून अधिक धनराशी वर्ग केलेली आहे. तसेच १५७ खेळाडूंना सुमारे ४०  लाखाहून अधिक ची धनराशी लवकरच वर्ग होणार आहे असे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी सांगितले.

महानगरपालिकेने आजच्या या स्पर्धेच्या शुभारंभा करिता आमंत्रित केल्याबद्दल प्रथम महिला महापौर यांनी महानगरपालिकेचे आभार मानले. आज तुम्हा खेळाडूंना पाहून मलाही लहान व्हावे असे वाटते. या पावसात आम्ही तुमच्या जागी खेळत असतो तर खुप आनंद झाला असता असे मत त्यांनी व्यक्त केले. जो कोणी खेळाडू स्पर्धा खेळत असतो, ज्याखेळाडूला शारिरीक व्यायाम असतो तो कुठल्याही संकटाला घाबरत नाही. कारण भर पावसात तुम्ही सर्व खेळाडू याठिकाणी उपस्थित राहिलेत हे दृष्य आजच्या पिढीकरिता प्रेरणादायी आहे. या स्पर्धमध्ये सर्वच जिकणार नाही, पण तुमची या स्पर्धेपोटी असलेली जिद्ध तुम्हाला तुमच्या यशापर्यंत एक दिवस नक्कीच नेईल. सर्व शाळेच्या फुटबॉल संघाना, प्रशिक्षकांना शुभेच्छा ठाकूर मॅडम यांनी शुभेच्छा दिल्या.  तसेच शहरातील क्रीडा प्रेमींकरिता ज्या पद्धतीने वर्षभर क्रीडा स्पर्धांचे  महानगरपालिका आयोजिन करते त्या करिता माजी महापौर प्रविणा ठाकूर यांनी  महापालिकेचे अभिनंदन केले.

**क्रीडा विभाग, मुख्यालय**
**वसई विरार शहर महानगरपालिका**